# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**सहाय्यक प्राध्यापक - निदानपंचक, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, महाराष्ट्र आयुर्वेदिक सेवा, गट-ब**

**धारिका क्रमांक : १०६५(८९)/२६४४/दहा** **जाहिरात क्रमांक : २५ /२०१०**

आयोगामार्फत **महाराष्ट्र शासनाच्या आस्थापनेवरील सहाय्यक प्राध्यापक- निदानपंचक, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, महाराष्ट्र आयुर्वेदिक सेवा, गट-ब पदाच्या एकूण ४ जागांसाठी ऑनलाईन** पध्दतीने **अर्ज** मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करु शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकुण पदसंख्या | अमागास | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | वि.जा.(अ) /भ.ज.(ब) | भ.ज. (क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चालू रिक्त पदे | १+१* | १☑ | -- | -- | -- | -- | १ | -- |
| ४ | | | | | | | | |

**२.१** (* उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित, ☑ उपलब्ध असल्यास अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी आरक्षित)

**२.२** महिलांसाठी आरक्षित असलेली पदे संबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.४** शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. २००३/प्र.क्र.१६५/०४/आयु-१ दि. ६ सप्टेंबर, २००५ नुसार खालील कोष्टकात नमूद केलेले अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत:-

| पदाचे नाव | अंध/अल्प दृष्टी | कर्णबधीर | अस्थिव्यंग |
|---|---|---|---|
| निदानपंचक | अपात्र | पात्र PD | पात्र OL |

**२.५** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३. वेतनश्रेणी :** रु.१५६००-३९१००+ ग्रेड पे रु.६०००/-, एकत्रित अंदाजे वेतन रु.३७५४०/-

**४. पात्रता-४.१** भारतीय नागरीक **४.२ वय-(१)**दिनांक **१ एप्रिल, २०११** रोजी ३३ वर्ष, मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे **(२)** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. **(३)** शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. **४.३ शैक्षणिक अर्हता :- (एक)** महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रीय परिषद अधिनियम १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखालील भारतीय केंद्रीय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता,आणि **(दोन)** सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी आणि **(तीन)** वरील क्र. (एक) येथे दर्शवलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित विषयाच्या प्रयोगनिर्देशक अथवा कनिष्ठ अधिव्याख्याता या पदाचा तीन वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव. पदव्युत्तर पदवीधारकांना अनुभवाची अट लागू नाही. **(चार)** ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयी मुलभूत संशोधनाचे निबंध अथवा पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.**(पाच)** इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहिण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहिजे.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६. कर्तव्ये व जबाबदा-या -** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. शुल्क : (१)** अमागास - रु.४१०/- **(२)** मागासवर्गीय - रु.२१०/- **(३)** सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**९. अर्ज करण्याची पद्धत :- (१)** प्रस्तुत भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.**(२)**पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ८ डिसेंबर,२०१० ते दिनांक २९ डिसेंबर,२०१०** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.**(३)**ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.**(४)** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transaction ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.**(५)**ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वत:चा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:ची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.**(६) मदत :** अर्जाच्या ऑनलाईन स्वीकृतीच्या व्यवस्थेसाठी आयोगाने मे. वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची नियुक्ती केली असून, सदर संस्थेने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांच्या सोयीकरिता महाराष्ट्रातील तालुका स्तरावर व विविध प्रमुख शहरांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकृती केंद्र [Online Application Centre (OAC)] निश्चित केली आहेत. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची (OAC) ची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह उपलब्ध आहे. अधिकृत केंद्राचा पत्ता व मदत **९७५७४४४०२०** या दूरध्वनी क्रमांकावरुन उपलब्ध करुन घेता येईल. या केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यात येणा-या सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा/भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त रु. २४/- इतकी रक्कम सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने संबंधित केंद्रचालकास अदा करावी लागेल. सदर मदत केंद्र संबंधित संस्थेने उमेदवारांच्या सोयीसाठी निश्चित केलेली असल्यामुळे आयोगाचा सदर केंद्रांशी काहीही संबंध नाही.

**१०.** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यातील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही **दिनांक २९ डिसेंबर,२०१० रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद करण्यात येईल. चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त होणारा Trasaction ID **दिनांक २९ डिसेंबर, २०१० रोजी २३.५९ पर्यंत** अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. Trasaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पद्धतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवाराचा अर्ज नाकारण्यात येईल.

**११.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ८ डिसेंबर, २०१०**

**नि. श. पटवर्धन**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**